श्रावण मासारंभानिमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा !

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, शुक्रवार, दि.२५ जुलै २०२५

वर्ष : ०४, अंक : ३४४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com


## संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष यांच्यावरील शाईफेक हल्ल्याचा पाटण येथे तीव्र निषेध




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२४, पाटण :** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक करूना हल्ल्याचा पाटण तालुक्यातील विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय पक्षांकडून मंगळवारी निषेध करून जोडो मारो आंदोलन करण्यात आले. तसेच या हल्ल्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीचे असणारे गुन्हेगार यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. अन्यथा संघटनांच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

याबाबतचे निवेदन प्रांताधिकारी पाटण यांना देण्यात आले. १३ जुलै रोजी अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर गुन्हेगारी प्रवृत्ती असणारे दीपक काटे व त्यांचे साथीदार यांनी शाईफेक करून हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. पाटण शहरातही विविध राजकीय पक्ष, विविध संघटना, सर्व वैचारीक शाहू, फुले, आंबेडकर विचारधारेच्या संघटना, पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पाटण येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोर येवून या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत दीपक काटेच्या प्रतिमेस जोडो मारो आंदोलन केले. यावेळी संबंधित गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन प्रांताधिकारी यांना देण्यात आले. नायब तहसीलदार रविंद्र सावंत यांनी हे निवेदन स्विकारले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पाटण तालुकाध्यक्ष नितीन भिसेनाईक, मनसे तालुकाध्यक्ष गोरख नारकर, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष शुभम उबाळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाचे अध्यक्ष प्राणलाल माने, ॲड. राजन भिसे, रिपब्लिकन सेना अध्यक्ष सचिन कांबळे, गौतम यादव प्रतिष्ठानचे अध्यक्ष चिंतामन यादव यांनी तीव्र शब्दात हल्ल्याचा निषेध व्यक्त केला.

यावेळी संभाजी ब्रिगेड, मनसे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गट, रिपब्लिकन सेना आनंदराव आंबेडकर गट, सहविचारी संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## २५-२६ जुलै रोजी विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज आज चंद्रपूर जिल्ह्याला रेड अलर्ट !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होत आहे. या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे विदर्भात (प्रामुख्याने पूर्व विदर्भात) २५–२६ जुलै दरम्यान मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांनी दिलेल्या सूचनेनुसार शुक्रवार, दिनांक २५ जुलै २०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्याकरिता रेड अलर्ट देण्यात आलेला आहे. पूर्व आणि उत्तर विदर्भात सर्वात अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे, ज्यात भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती, आणि यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश आहे. सध्याच्या अंदाजानुसार २६ तारखेला पावसाचे प्रमाण सर्वात अधिक असण्याची शक्यता आहे. २५–२६ जुलै दरम्यान पूर्व विदर्भात धरण साठ्यात वाढ होऊन नदी–नाल्यांना पूर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सखोल भागांमध्ये पुराची स्थिती निर्माण होऊ शकते. नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात येत आहे.

## पाऊसामुळे ३-४ तासापासून बसमध्ये अडकलेल्या ६० शालेय विद्यार्थ्यांची सुटका




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, राजुरा (चंद्रपूर) :** काल राजुरा तालुक्यातील वरुर – विरुर स्टेशन मार्गावरील नाले तुडुंब भरून वाहत होते. टेंबुरवाही, चिचबोडी, शिर्सी येथे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने अनेक वाहने अडकली होती. विशेषतः ६० शालेय विद्यार्थी बसमध्ये तीन–चार तास अडकले होते. अशावेळी विरुर पोलिसांनी धाडसी भूमिका घेत, आपल्या पोलिस जीपमधून पाण्यात जाऊन विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, बिस्किटे दिली. रात्र असतानाही, पाण्यातून दोन वेळा फेरफटका मारत परिस्थितीची पाहणी केली. स्वतः ठाणेदार वाकडे यांनी जीप समोर लावून दोन बसेस बाहेर काढल्या. शेवटी, रात्रो १२ वाजेपर्यंत पोलिसांनी प्रत्येक विद्यार्थ्याला सुखरूप घरी पोहोचवले. यावेळी पीएसआय जाधव, पोलिस कर्मचारी राहुल वैद्य, विजय मुंडे, हर्षल लांडे आणि इतर कर्तव्यदक्ष अधिकारी उपस्थित होते. सलाम आहे अशा जबाबदार, धाडसी पोलिस टीमला!

## पुढील ४ दिवस राज्यभरात धो-धो! 'या' भागांत अतिवृष्टीची शक्यता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** राज्यभरात ब्रेक घेतलेल्या पावसाने गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. पावसाची ही स्थिती पुढील ४ दिवस कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने सूचित केले आहे. कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



कोकणातील रायगड आणि रत्नागिरी, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे साताऱ्यातील काही भाग आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या २५ जुलैला या भागांत रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

उर्वरित महाराष्ट्रातही मध्यम स्वरुपाचा पाऊस बरसणार आहे. मराठवाड्यासह, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाच्या भागांत २६ जुलैला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत वीजांच्या कडकडाटासह पाऊस बसण्याची शक्यता आहे. यातच कोकणात पावसाची ही स्थिती पुढील चार दिवस कायम राहणार असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पावसाने पुनरागमन केल्याने बळीराजा सुखावला आहे. तर दुसरीकडे रायगडला मुसळधार पावसाने झोडपले आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, श्रीवर्धन, माणागाव आणि इतर दमदार पाऊस झाला आहे. किनारपट्टी भागात पावसाचा जोर वाढला आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे हवामान विभागने येत्या ४८ तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरीलाही अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

मुंबई आणि उपनगरांमध्येही दमदार पाऊस सुरु आहे. हवामान विभागाने मुंबईसाठी पुढील चार दिवस धोक्याचे असल्याचे सूचित केले आहे. २६ जुलैला समुद्रात ४.६७ मीटर उंच लाटा उसळणार असल्याचीही शक्यता आहे. नागरिकांनी समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'कुंडलवाडी'ची केळी साता समुद्रपार ; विदेशातही गोडी वाढली !

### संगणक अभियंत्याने नोकरी सोडून शेतीत केला नवा प्रयोग

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२४, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहरातील प्रसिद्ध उद्योजक तथा तिरुपती फर्टीलायझर्सचे संचालक तथा संगणक अभियंत्याची नोकरी सोडून ग्रामीण भागातील शेतीकडे वळलेले प्रयोगशील शेतकरी अशी पंचक्रोशीत ओळख असलेले आदित्य हणमंतराव बेजगमवार यांनी शेतात लागवड केलेल्या केळीला सध्या आखाती देशातून मागणी वाढली असून ४ एकर जमिनीवर लागवड केलेल्या केळीतून विक्रमी उत्पादन मिळवीत शेतकऱ्यांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे.



महाराष्ट्र व तेलंगणा राज्याच्या सीमेवर नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील नगर परिषदेचे ठिकाण म्हणून कुंडलवाडी शहराची ओळख आहे. शहराचे भूमिपुत्र आदित्य बेजगमवार यांनी संगणक अभियंत्याची पदवी मिळवून पुणे येथे काही वर्षे नोकरी केल्यानंतर त्यांचे मन कुंडलवाडी शहरातील असलेल्या आपल्या शेतीकडे वळले व शेतीत नवनवीन प्रयोग करीत शेती व्यवसायाला अच्छे दिन कसे प्राप्त होतील यासाठी प्रयत्न केले. यातच त्यांनी गतवर्षी दि.१ ऑगस्ट रोजी कुंडलवाडी ते कार्ला फाटा रोडवरील त्यांच्या शेतातील ४ एकर जमीनीवर यश अग्रो कंपनी हैदराबादचे जी–९ वाणाच्या केळीची लागवड केली.

चार एकर जमिनीवर साडेपाच हजार केळीचे झाडांची लागवड केली. यातील सद्यस्थितीत ९१८ केळीचे झाडांपासून २१ टन एवढे केळीचे विक्रमी उत्पादन झाले असून यातून ४ लाख ४१ हजार रुपये एवढे आर्थिक उत्पन्न मिळाले आहे.

केळीचे एक घड २३ किलो वजनाचे असून ही केळी अतिशय गोड व चवदार असून घडही वजनदार आहे. सध्या या केळीला परदेशातून विशेषतः इस्रायल, दुबई, इराक आखाती देशातून मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

यातच दि.२० जुलै रोजी यु.लिंक. ॲग्री टेक लिमिटेड पुणे कंपनी मार्फत पहिला टप्पा २१ टन केळी ही विदेशात पाठवण्यात आली आहे. या केळी लागवडीसाठी त्यांना विशेषतः फिनिक्स क्रॉप केअर प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीचे विक्री व्यवस्थापक शिवाजी राजुरकर यांचे संपूर्ण मार्गदर्शन मिळाले.

## खा.सोनवणेंकडून महामार्ग, रेल्वेसाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२४, बीड :** बीड जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे–जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत, भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठपुरावा पाहून मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जिल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मंडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली.

> बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महामार्ग, रेल्वेचे कामे होणे अत्यंत महत्त्वाचे असून, केंद्रीय मंत्री गडकरीसाहेब यांनी वैयक्तिक लक्ष देतो, असा शब्द दिला आहे. तर रेल्वेमंत्र्यांनी मागण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी लवकरात लवकर होण्यासाठी माझ्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जाईल.
>
> **– खा.बजरंग सोनवणे, बीड मतदारसंघ.**



दि.२४ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. यावेळी शेगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील परतूर–माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथील अपूर्ण असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. माजलगाव–केज बिटमधील नादुरुस्त भागांची दुरुस्ती व तांत्रिक दोष दूर करण्याबाबत निर्देश द्यावेत, धारूर घाटातील प्रस्तावित वळण मार्गाचे काम तसेच बर्दापूर–लोखंडीसावरगाव चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, केज–कळंब मधील मांजरा नदीवरील पुलाच्या कामासंदर्भात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून काम पूर्ण करावे, पैठण–पंढरपूर रस्ता व अहमदपूर–मांजरसुंबा–पाटोदा या रस्त्यांवरील समस्या तातडीने सोडवाव्यात व प्रस्तावित अतिरिक्त बाबींना मंजुरी देण्यात यावी. छत्रपती संभाजीनगर बीड सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील गढी येथील उड्डानपुल व रस्ता हा विभागाच्या तांत्रिक दोषामुळे अपघात होऊन ६ युवकांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला. या तांत्रिक दोषाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मयतांच्या कुटूंबियांना मदत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली. या सर्व मुद्द्यांकडे ना.गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आश्वासन दिले व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या. याच वेळी 'तुमचा बीड जिल्ह्याच्या विकासासाठीचा पाठपुरावा आणि धडपड चांगली आहे', अशा शब्दात पाठीवर थाप देवून कौतूक केले. यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची त्यांच्या संसदभवन कार्यालयामधे खा.सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी, आहिल्यानगर–बीडपरळी रेल्वे प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित १० रोड ओव्हर ब्रिज व ढोलेवस्ती (बीड) रोड अंडरपासचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे. बार्शीनाका (बीड शहर) रेल्वे स्टेशनवर प्रवासी संख्येच्या प्राथमिकतेच्या आधारे थांबा देण्यास मंजुरी देणे, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर रेल्वेगाड्यांना थांबा देण्याचा प्रस्ताव मंजूर करून आदेश त्वरित निर्गमित करणे, बीड–आहिल्यानगर–सीएसटी (मुंबई) अशी नियमीत रेल्वेसेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवित मागण्यांसदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला.




## गुरुविण कोण दाखवी वाट!

आयआयटी, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी यांसह व्यवस्थापन शिक्षणाच्या अनेक नामांकित संस्था, खासगी अभिमत विद्यापीठे, वैद्यकीय महाविद्यालये आणि लवकरच साकारणारी नवी एज्युसिटी अशा सर्व सुविधांनी सजलेली मुंबई जागतिक नकाशावर देशोदेशीच्या विद्यार्थ्यांना हवीहवीशी शैक्षणिक पंढरी वाटते, असा निष्कर्ष नुकताच आला.

विद्यार्थ्यांचे समाधान, अपेक्षा, परवडण्याजोगा खर्च अशा निकषांच्या आधारे क्यूएस या लंडनस्थित संस्थेने हा अभ्यास अहवाल केला. एकीकडे हा अहवाल आणि दुसरीकडे याच मुंबईत शिक्षण उपसंचालकांचे गैरव्यवहाराच्या आरोपांच्या चौकशीसाठी निलंबन झाल्याचे वृत्त. एकीकडे खासगी संस्थांच्या वेलींवर बहरणारे चकचकीत शिक्षण आणि दुसरीकडे सरकारी कार्यालये, व्यवस्था यात विद्यादानालाही पोखरून काढणारी समांतर आर्थिक व्यवस्था. जागतिक क्रमवारीतील आनंद साजरा करतानाच, शिक्षण क्षेत्रात सुरू असलेल्या गैरप्रकारांकडेही गांभीर्याने पाहणे गरजेचे ठरते.

विधिमंडळ अधिवेशनात शिक्षण उपसंचालकांच्या चौकशीचा मुद्दा गाजला. शालार्थ आयडी वाटपात घोटाळा, शैक्षणिक पात्रता नसताना ओळखपत्रे देणे, वाढीव पदांना किंवा रात्रशाळांना बेकायदा मान्यता अशा अनेक तक्रारी आहेत. अनुदानित शाळांमध्ये रोडावत्या विद्यार्थीसंख्येमुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन आणि नव्याने भरती केले जाणारे शिक्षक यांचे प्रश्न महामुंबईत जटिल आहेत. नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांसाठी पवित्र हे पोर्टल असले तरी त्यातही मागच्या दरवाजाने काही गोष्टी घडतात, अशा तक्रारी आहेत. समायोजनाच्या बाबतीतही सुयोग्य अशा सॉफ्टवेअरच्या वापराने शिक्षकांच्या अधिकाधिक सोयी, त्यांना पर्यायी विषय शिकवायचा झाल्यास आवश्यक असणारे प्रशिक्षण, आदी मुद्द्यांचा समावेश करून स्वयंचलित समायोजन आराखडा करणे शक्य आहे. मात्र झारीतील शुक्राचार्यांना असे तोडगे मान्य, नसतात.

पन्नाशी ओलांडलेल्या कुर्ला, घाटकोपरला शिकवणाऱ्या एखाद्या शिक्षकाला पालघर, बदलापूरला टाकायचे आणि अशा फायली थांबविण्यासाठी नाचवायचे, असे प्रकार सुरू असतात. पदांच्या मान्यता रोखणे, संस्थांचे वेतन अनुदान रोखणे, अशा तक्रारीही येत असतात. पूर्वी शासननिर्णयही दडवून ठेवले जायचे, आता ते शक्य नसले, तरीही सर्व काही सुरळीत नाही. शिक्षकांच्या प्रतिष्ठेला साजेसे वेतन आता दिले जात असले, तरी ते पदरात पाडण्यासाठी प्रतिष्ठा धुळीला मिळेल असे काही प्रकार शासनदरबारी घडतात. शिक्षणसेवकातून कायमस्वरूपी शिक्षक झाल्यास पगार वाढतो, तेव्हा त्या प्रमाणात बिदागी देण्याच्या मागणीने अनेकांचे डोळे पांढरे होतात. विनाअनुदानित शिक्षण संस्थांनी महसुलाचे वेगवेगळे मार्ग स्वीकारले. नियुक्त्यांपासून ते सरकारी भूखंडवापरापर्यंत अनेक प्रकारच्या प्रस्तावांवर 'ना हरकत'ची मोहोर उमटविण्याचे मोल गगनाला भिडले आहे.

राज्यभरात सुमारे दीडशेहून अधिक शिक्षणाधिकारी तर सातपैकी चार उपसंचालक चौकशीच्या फेऱ्यात आहेत. म्हणजे महामुंबईचे लोण राज्यभर पसरले असून लाचलुचपत प्रतिबंधक खात्यात आता पोलिस व महसूलऐवजी शिक्षण विभागाला टॉप रँकिंग मिळू शकते, अशी कुजबूजही मंत्रालयात चालते. परदेशातील विद्यार्थ्यांना भलेही मुंबईतील शिक्षण परवडण्याजोगे वाटत असेल; परंतु इथल्या विद्यार्थ्यांसाठी मात्र ते महागडे होत चालले आहे. या समांतर व्यवस्थेत खेळणाऱ्या पैशाचे वजन मोठे आहे.

सुविधा आणि ॲम्बिअन्सच्या जोरावर शाळेचेही दरपत्रक लागू होत असल्याने शाळांच्या फीचेही मेन्यूकार्ड झाले आहे. काहीअंशी पालकही त्यास कारणीभूत आहेत. शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मान्यता, परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे याबाबतीत गुरूपेक्षा वेगळी वाट दाखविणारा कोण असतो, हे सर्वांना ठाऊक असते. मुंबईजवळ नव्याने एज्युसिटी उभी राहणार आहे. परंतु शिक्षणाची योग्य घडी बसविली, पारदर्शकता आणली, तरच शिक्षणाच्या नव्या कक्षांना आपण स्पर्श करू शकू; अन्यथा जागतिक क्रमवारीत येऊनही व्यवस्था मात्र पोखरलेलीच राहील.

# जीवन म्हणजे क्रिकेट राजा!

मानवी जीवनाला जितक्या उपमा देता येतील, त्या सर्व कमीच ठरतात. जीवन हे प्रत्येकासाठी वेगळं, तरीसुद्धा एक समान खेळासारखंच असतं. क्रिकेट या लोकप्रिय खेळाशी जीवनाची तुलना करणं हे एक फारच बोलकं रूपक आहे. महान क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा! हे गाणं १९७९ मध्ये गायलं होतं. शांताराम नांदगावकर यांनी या गीताचे बोल लिहिले असून, गौतम गिरीष यांनी त्याला संगीत दिलं आहे. आजही कधीमधी हे गीत रेडिओवर वाजताना कानावर पडतं आणि आयुष्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळतो.

सुनील गावस्कर, ज्यांना लिटिल मास्टर म्हणून ओळखलं जातं, यांनी फलंदाज म्हणून भारतीय क्रिकेट संघात अपूर्व योगदान दिलं आहे. त्यांच्या फलंदाजीतील संयम, चातुर्य आणि कष्ट आजही आदर्श मानले जातात. त्यांनी गायलेल्या या गाण्याच्या माध्यमातून त्यांनी मानवी जीवनाचं सारच क्रिकेटशी जोडून मांडलं आहे.

क्रिकेट हा खेळ अनिश्चिततेचा समजला जातो. त्यात कधी कोण जिंकेल, कोण बाद होईल, हे सांगता येत नाही. जीवनही असंच अनिश्चिततेने भरलेलं असतं. कधी सुखाचे क्षण येतात, तर कधी अडचणींचा सामना करावा लागतो. क्रिकेटमधील फलंदाजी आणि गोलंदाजी ही दोन्ही संघांसाठी संधी असते जिंकण्याची, टिकून राहण्याची आणि विजय मिळवण्याची.

बालपण, किशोरावस्था आणि तारुण्य यांना आपण फलंदाजी समजू शकतो. ही जीवनातील अशी अवस्था असते, जिथे आक्रमकता, ऊर्जा, स्वप्न आणि प्रयत्नांची गरज असते. याच काळात माणूस अधिक कमवतो, शिकतो, अनुभव घेतो आणि भविष्य घडवतो. प्रौढावस्था आणि वृद्धावस्थेला आपण गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाशी जोडू शकतो. ही अवस्था असते संयमाने, चातुर्याने आणि अनुभवाच्या आधारे संकटांशी लढण्याची.

क्रिकेटमध्ये प्रत्येक गोलंदाज आपला षटक जपून टाकतो. प्रत्येक चेंडू विचारपूर्वक फेकतो. तसंच जीवनातही प्रत्येक क्षण संकटांविना जाईल, यासाठी माणसाने सतर्क राहायला हवं. जशी फलंदाजी म्हणजे धावा काढणं, तशीच जीवनातही वेगवेगळ्या गोष्टी 'कमावणं' खूप महत्त्वाचं आहे. कमवणं म्हणजे केवळ पैसा नव्हे, तर अनुभव, ज्ञान, प्रतिष्ठा, नाती, आरोग्य आणि आत्मिक समाधानही कमावणं होय.

गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण म्हणजे स्वतःचा बचाव करणं. आजार, अपयश, शत्रू, नैसर्गिक संकटं आणि अपघात यांपासून स्वतःला सुरक्षित ठेवणं म्हणजे क्षेत्ररक्षण. क्षेत्ररक्षक नेहमी सज्ज असतो, तसंच जीवनातही माणसाने संकटं केव्हा येतील, याची जाणीव ठेवावी लागते.

हे गाणं एका फलंदाजाच्या दृष्टिकोनातून लिहिलं गेलं आहे. आपण जीवन जगत असताना फलंदाजी करत असतो, तर आपल्या विरोधात अनेक 'गोलंदाज' तयार असतात – म्हणजेच आपल्याला त्रास देणारे, टिका करणारे किंवा अपयशी करण्यासाठी टपलेले लोक. 'यष्टीरक्षक' हे आपल्या मागे उभे असलेले जवळचे लोक देखील कधी कधी अपयशासाठी कारणीभूत ठरतात. त्यांच्या नजरा सतत आपल्यावर असतात, आपण चूक करतोय का यासाठी. 'झेल' घेणारे क्षेत्ररक्षक जसे कुठे चूक होईल याची वाट पाहत असतात, तसेच जीवनात काही लोक आपल्या अपयशाची वाट पाहत असतात. म्हणून प्रत्येक निर्णय फार विचारपूर्वक घ्यावा लागतो. व्यवहारिक दृष्टिकोन, संयम, आणि चतुराई या गुणांमुळे माणूस या 'झेलां'पासून वाचू शकतो.

जीवनात अनेक संधी येतात. त्या वेळच्या वेळेस ओळखणं आणि त्यांचं सोनं करणं हीच खरी कौशल्याची कसोटी असते. जसे क्रिकेटमध्ये एक चांगली चेंडू सोडून दिली तर ती पुन्हा मिळत नाही, तसंच जीवनातही एकदा संधी गेली की ती पुन्हा मिळेल याची खात्री देता येत नाही.

जीवन म्हणजे क्रिकेट राजा! इथे प्रत्येकाला आपली 'इन्हिंग' खेळायची आहे. कुणी धावांची शतकं करतो, कुणी एकाच चेंडूवर बाद होतो. पण महत्त्वाचं हे आहे की, आपण खेळत राहिलं पाहिजे!

शेवटी, हुकला तो संपला हे शब्द हे फक्त इशारा नाही, तर जीवनाचं गमक सांगणारे शब्द आहेत. म्हणूनच प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण, ही एक नवीन संधी आहे. त्याचं सोनं करा – कारण जीवन म्हणजे क्रिकेट राजा हुकला तो संपला !

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# कणेकर गेले ; खुमासदार लेखणी थंडावली

महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, स्तंभ लेखक शिरीष कणेकर यांचा आज स्मृतिदिन. २५ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वांना धक्का बसला होता कारण ते असे अचानक निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते कारण त्यांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी लिहिलेले लेख वर्तमानपत्रात छापून आले होते. माझ्यासाठी तर तो खूप मोठा धक्का होता कारण ते माझे सर्वात आवडते लेखक होते. त्यांची जवळपास सर्वच पुस्तके मी वाचून काढली आहेत. वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचूनच मी स्तंभलेखनाकडे वळलो. त्यांच्या लेखाचा विषय माझा सर्वात आवडीचा विषय. माझाच कशाला आज जे चाळीशी – पन्नाशीत आहे त्या सर्वांचा आवडीचा विषय ते आपल्या लेखणीतून खुमासदारपणे हाताळत आणि तो विषय म्हणजे चित्रपट आणि क्रिकेट. वर्तमान पत्रात त्यांचे चित्रपट आणि क्रिकेटवर लेख छापून आले की ते झटक्यात वाचून संपवणे आणि त्यावर तासनतास चर्चा करणे हा आमच्या मित्र मंडळींचा आवडता छंद. त्यांच्यामुळेच आम्हाला जुन्या काळातील कुंदनलाल सैगल, दिलीप कुमार, राज कुमार, अशोक कुमार, राज कपूर, शम्मी कपूर, देवानंद या अभिनेत्यांची ओळख झाली. तसेच पन्नास ते ऐंशी च्या दशकातील क्रिकेटपटूंची ओळख झाली. केवळ अभिनेते, अभिनेत्री आणि क्रिकेटरच नव्हे तर हिंदी सिनेसंगीत हा देखील त्यांच्या लेखनाचा आवडीचा विषय होता. अतिशय अभ्यासपूर्ण, खुसखुशीत आणि विनोदीशैली हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य. अतिशय खुसखुशीत विनोदी शैलीत ते लिहित असल्याने तरुण वर्ग त्यांचा मोठा वाचक बनला. तरुण मुलांचे ते आवडते लेखक होते. तरुण मुले कट्ट्यावर बसून ज्या प्रमाणे गप्पा मारत अगदी तसेच त्यांचे लेखन होते त्यामुळेच त्यांचा सर्वाधिक वाचकवर्ग हा तरुण होता. वर्तमानपत्रात लेख लिहून स्तंभलेखक म्हणून नावारूपास आलेल्या शिरीष कणेकर यांनी पुढे अनेक पुस्तके लिहिली. यादो की बारात,



शिरीषासन, सिनेमाबाजी, मुद्दे आणि गुद्दे, चहाटळकी, सुरपारंब्या, सिनेमगिरी, लागाव बत्ती, कणेकरी, चिमटे आणि गालगुच्चे, आसपास, मेतकूट, चित्ररूप, कल्चर – वल्हचर असे त्यांचे विविध वर्तमानपत्रातील स्तंभ लेखन गाजले. गाये चला जा, यादो की बारात, एक्केचाळीस, गोळी मार भेजे में, गोतावळा, कुरापत, मखलाशी, फटकेबाजी, पुन्हा यादों की बारात, टिवल्या – बावल्या, चंची, चापट पोळी, डॉलरच्या देशा, एकला, रहस्यवल्ली, सुरपारंब्या, क्रिकेटवेध, नट – बोलट, बोलपट, सिनेमा डॉट कॉम ही त्यांची पुस्तके खूप लोकप्रिय झाली. शिरीष कणेकर यांनी लेखनासोबत क्रिकेट व चित्रपटावर स्टॅण्ड अप शो देखील केले. माझी फिल्लमबाजी, फटकेबाजी, ....आणि पुन्हा कणेकर हे त्यांचे स्टँड अप शो खूप लोकप्रिय झाले. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले पण वाचकांच्या मनात त्यांचे जे स्थान होते ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ होते. कणेकर गेले आणि खुमासदार लेखणी थंडावली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या खुमासदार लेखनाने तरुण वाचकांच्या मनात आगळे स्थान निर्माण करणारा हा अवलिया लेखक आज आपल्यात नाही हे मन मानायला तयार नाही. शिरीष कणेकरांची फिल्लमबाजी, फटकेबाजी पुन्हा अनुभवता येणार नाही याची खंत वाटते. असो नियतीने जे मांडून ठेवले आहे ते स्वीकारावेच लागेल.

**शिरीष कणेकर यांना**
**स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**
**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## एक उपवास..

गत हारी अमावस्या
दीप पुजा करे खास
करा श्रावण स्वागत
सुरु होईलं चातुर्मास

गांधीजी सांगायचे
करा एक उपवास
वाचेल अमोल अन्न
मिळे भुकेल्या घास

इस्लाम जैनहिंदुंच्या
समजून घ्या धर्मास
करतात सर्वत्रलंघन
दिवसहप्ता वा मांस

पचन संस्था विश्राम
सुडौलता हो तनास
विचार येती चांगले
शांतता मिळे मनास

पथ्ये सारी जाणावी
करताना ते उपवास
करु नका फुकाथट्टा
नको उगा उपहास

फळे मिठाई खिचडी
रे बकासुरी बकवास
लंगन ख–या अर्थाने
तृप्तता हवी जीवास

धर्म शास्त्रात सांगड
नसावा अंध विश्वास
जाणून करी उपवास
मोकळा होईल श्वासे

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक सारी ताजी बातमी

# श्रावण मासाचे महत्व




२५ जुलैपासून श्रावण मासारंभ होत आहे. आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या काळात भगवान श्री विष्णू महासागरात शेषशय्येवर योगनिद्रा घेत असल्याने सृष्टीचा भार भगवान शिव शंकरांवर पडतो. त्यामुळे या दिवसांत शिव उपासनेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. श्रावण मसाविषयी शास्त्रीय माहिती या लेखातून जाणून घेऊया.

'भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या 'श्रीमद्भगवत्गीते'तील संवादात भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे, 'मासांमध्ये (महिन्यांमध्ये) मी 'मार्गशीर्ष' मास आहे. याचप्रमाणे शिव आणि सनतकुमार यांच्यामध्ये श्रावण मासाबद्दल पुढील आशयाचा संवाद झाल्याचे पुराणात म्हटले आहे. भोलेनाथ शिव म्हणतात...

**द्वादशस्वपि मासेषु श्रावणो मेऽतिवल्लभः। श्रवणार्हं यन्माहात्म्यं तेनासौ श्रवणो मतः ।।**

**श्रवणर्क्षं पौर्णमास्यं ततोऽपि श्रावणः स्मृतः । यस्य श्रवणमात्रेण सिद्धिदः श्रावणोऽप्यतः ।।**

**अर्थ :** १२ मासांतील 'श्रावण मास' मला अतिप्रिय आहे. त्याचे माहात्म्य श्रवण करण्यास योग्य आहे. त्यामुळे त्याला 'श्रावण मास' असे म्हटले जाते. श्रावण या शब्दाची उत्पत्ती 'श्रवण' या शब्दातून झाली आहे. 'श्रवण' शब्दाचे २ अर्थ होतात. त्यांपैकी एक म्हणजे 'हिंदु पंचांगातील २२ वे नक्षत्र', असा आहे आणि दुसरा अर्थ 'श्रवण म्हणजे ऐकणे.' श्रावणात श्रवणभक्ती केल्याने सिद्धी प्राप्त होतात. त्यामुळेच हा मास अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो.

हिंदु धर्मात पंचांगातील ५ अंगांपैकी 'नक्षत्र' या अंगाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासाच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार आहेत, उदा. चैत्र मासातील पौर्णिमेला चंद्र 'चित्रा' नक्षत्रात असतो; म्हणून त्या मासाचे नाव 'चैत्र' आहे. श्रावणातील पौर्णिमेला चंद्र 'श्रवण' नक्षत्रात असतो. त्यामुळे त्या मासाचे नाव 'श्रावण' आहे. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्राचे चैतन्य आणि ऊर्जा त्या संपूर्ण मासात अधिक प्रमाणात कार्यरत असते.

**शास्त्रानुरुक्तो बहुपुत्रमित्रः सत्पात्रभक्तिः**
**विजितारिपक्षः ।**
**चेज्जन्मकाले श्रवणा हि यस्य प्रेमा**
**पुराणश्रवणे प्रवीणः ।। – जातकाभरण**

**अर्थ :** श्रवण नक्षत्रावर जन्माला आलेला मनुष्य शास्त्रप्रेमी, अनेक मित्र असलेला, मुलाबाळांची आवड असणारा, विधायक कार्ये करणारा, शत्रूंवर विजय मिळवणारा, पुराणश्रवण आदींमध्ये रुची असलेला असतो.

हिंदु संस्कृतीचे निर्माते असणार्या ऋषिमुनींना याचे सर्व ज्ञान होते. त्यामुळेच त्यांनी आपल्यावर उत्तम आणि उदात्त संस्कार व्हावेत आणि आपल्याला आवश्यक ते धर्मज्ञान सहजपणे मिळावे, यांसाठी श्रावण मासात अधिकाधिक ग्रंथ, कथावाचन, पारायण, व्रतवैकल्ये, दानधर्म इत्यादी करण्याचे मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच वर्षभर मांसाहार करणारे लोक श्रावण मासात मांसाहार पूर्णतः वर्ज्य करतात. बहुतेक घरांत श्री सत्यनारायणाची पूजा अगत्याने केली जाते. श्रावणात प्रत्येक वारानुसार व्रते, विशेष पूजा, उपवास इत्यादी गोष्टी स्त्रिया तर करतातच; पण बहुतेक पुरुषसुद्धा दाढी न करणे, केस न कापणे, तसेच उपवास करणे, घरात श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ माहात्म्य, शिवलीलामृत, शिवपुराण किंवा कुठल्याही धार्मिक ग्रंथांची पारायणे इत्यादी आचारांचे पालन करतातच. त्यामुळे 'ब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांचे मानवी जीवन किंवा चराचर सृष्टी यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतातच', याचाच हा पुरावा आहे. तात्पर्य काय, तर हिंदु धर्मशास्त्रातील विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्या जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते घडवण्यासाठी कटिबद्ध असणार्या प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला या 'श्रवण' नक्षत्रामुळे आणि 'श्रावण' मासामुळे योग्य ते क्रियमाण वापरण्यासाठी भरपूर प्रमाणात बळ मिळते. **(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग )**

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मंद्रूपच्या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२४, सोलापूर :** सोलापूर येथील संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २६ जुलै ते १ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या सप्ताहात महाविद्यालयाचा वर्धापन दिन व विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभात फेरी, सर्वरोग निदान शिबिर, वक्तृत्व स्पर्धा, वृक्षारोपण व व्याख्यानाने समारोप करण्यात येईल.

यामध्ये शनिवार, दिनांक २६ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयाचा वर्धापन दिन व प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ सोमवार, दि.२८ रोजी मंद्रुप गावातून प्रभात फेरी काढण्यात येईल. मंगळवार, दि.२९ रोजी महाविद्यालयात सोलापूर येथील डॉ. स्मित जानराव यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येणार आहे. बुधवार, दि.२० रोजी महाविद्यालयात तालुकास्तरीय तायक्कांदो स्पर्धा घेण्यात येणार आहेत. गुरुवार, दि.३१ रोजी तालुकास्तरीय कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. शुक्रवारी दि.०१ ऑगस्ट रोजी विद्यापीठ वर्धापन दिन कार्यक्रम, वृक्षारोपण करण्यात येईल व प्रा.एम.आर कांबळे यांच्या व्याख्यानाने सप्ताहाचा समारोप होणार आहे. तरी कार्यक्रमास माजी विद्यार्थी, पालकांनी उपस्थित राहावे, असे प्राचार्य डॉ.एम.एन.जगताप व मुख्य समन्वयक प्रा.डॉ.जवाहर मोरे यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांसाठी पारनेर तहसील समोर भूमिपुत्रांचा ठिय्या आंदोलन




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी. या प्रमुख मागणीसाठी गुरूवार, दिनांक २४ जुलै २०२५ रोजी राज्यभर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी चक्काजाम आंदोलनाची घोषणा केली होती. त्या पार्श्वभूमीवर भूमिपुत्र शेतकरी संघटनेने या चक्काजाम आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. त्याच अनुषंगाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली पारनेर तहसील कार्यालयात शेतकऱ्यांसाठी ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे, कोण म्हणत देणार नाही घेतल्याशिवाय राहणार नाही. अशा विविध घोषणांनी तहसील परिसर दणाणून गेला होता. तसेच महायुती सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी. अशी मागणी यावेळी संतोष वाडेकर यांनी केली. यावेळी मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार दिपक कारखिले यांना देण्यात आले. यावेळी संतोष वाबळे, सुभाष पाटील करंजुले, राजेंद्र करंदीकर, अविनाश देशमुख, प्रवीण खोडदे, सुरेश गोळे, नंदन भोर, मजाबापू वाडेकर, तेजस भोर, गोरख पठारे, राहुल गुंड, नारायण रोकडे, पांडुरंग पडवळ, वसंत साठे, विशाल करंजुले, अनिल सोबले, अरुण बेलकर, जय गायकवाड, रागूनाथ मांडगे, सतीश बागल, गणेश दळवी, बाळासाहेब वाळुंज, रामदास बालवे, बबन गुंड, संभाजी वाळूज यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्रशाळा अल्याणी येथे भव्य विज्ञान प्रदर्शन संपन्न



**अक्षराज : गणेश गायकर**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** गुरुवार, दिनांक २४ जुलै २०२५ रोजी अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन सोसायटी जनरल सिक्युरिटीज सर्विस लॅब ऑन बाईक या प्रोग्रामच्या वतीने जिल्हा परिषद केंद्रशाळा अल्याणी या शाळेत भव्य असे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहणे म्हणून केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ.राजेंद्र चौधरी अल्याणी शाळेचे मुख्याध्यापक गणपत वाघ, जि.प.शाळा शेलवली (बां.) शाळेचे पदवीधर शिक्षक बाळू धानके, सुधाकर पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व विनायक सापळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य किरण वाळिंबे हे उपस्थित होते. या संपूर्ण नियोजनात शाळेतील वरीष्ठ शिक्षक एकनाथ सातपुते, पदवीधर शिक्षक कमलाकर बागवे, शेखर घोडविंदे, सुधीर पाटोळे यांनी विशेष सहकार्य केले. जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकवृंद भावना भोईर, दर्शना शिर्के, स्मिता पाटील, प्रतिभा पष्टे उपस्थित राहिले. या प्रदर्शनाला विद्यार्थी आणि पालक वर्ग मिळून सुमारे ३७० जणांनी उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, लो कॉस्ट मॉडेल तसेच औषधी वनस्पती विषयक मॉडेल मिळून विविध प्रकारचे ४० मॉडेल मांडले होते. विद्यार्थ्यांनी अतिशय समर्पक शब्दात प्रत्येक मॉडेल विषयी सादरीकरण केले. उपस्थितांनी त्यांना उत्तम प्रतिसाद देऊन सर्व प्रयोग समजावून घेतले. या प्रदर्शनाला अल्याणी केंद्रातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक मॉडेल मधील विज्ञान समजावून घेतले . प्रदर्शनाचे आयोजन करण्यात अगस्त्या फाउंडेशनचे अमोल चौधरी यांनी बहुमोल भूमिका बजावली. यावेळी शेवटी प्रदर्शनात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन प्रदर्शनाची सांगता झाली.

## जनाबाई गंगाधर मस्के यांचे निधन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मौजे डोणगांव येथील कै.जनाबाई गंगाधर मस्के यांचे दिनांक २३ जुलै २०२५ रोजी रोजी रात्री ९:३० वाजता अल्पशा आजाराने वयाच्या ६० व्या वर्षी त्यांचे राहत्या घरी निधन झाले असून त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम अंत्यसंस्कार गुरुवार, दिनांक २४ जुलै २०२५ रोजी दुपारी ठिक १ वाजता डोणगांव येथील स्मशानभूमीत केले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा सून, ३ मुली जावई नातू नातवंडं असा मोठा परिवार आहे. ग्रामपंचायत सदस्य साहेबराव मस्के यांच्या त्या मातोश्री होत्या पत्रकार प्रल्हाद मस्के यांच्या ते काकू होत्या.

# टाकळी ढोकेश्वर येथे लंके प्रतिष्ठानतर्फे रेशन कार्ड कॅम्पचे आयोजन

## तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांचा उपक्रम

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वर, ढोकी, तिखोल, काकणेवाडी, भोंद्रे, परिसरातील ग्रामस्थांना एकाच ठिकाणी आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खासदार निलेश लंके प्रतिष्ठान, पारनेर तालुका यांच्या वतीने तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या पुढाकारातून रविवार, दिनांक २७ जुलै २०२५ रोजी विशेष सेवा कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर येथे सकाळी ९ वाजता होणाऱ्या या कॅम्पचे उद्घाटन राष्ट्रवादीचे नेते दिपक अण्णा लंके यांच्या हस्ते होणार आहे. या कॅम्पमध्ये ग्रामस्थांना विविध सुविधांचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये नवीन रेशनिंग कार्ड, रेशन कार्डवरील नाव कमी करणे किंवा दुरुस्त करणे, रेशन कार्ड ऑनलाइन करणे, बांधकाम कामगार कार्ड, आधार कार्ड अपडेट, आभा कार्ड काढणे तसेच रहिवासी, उत्पन्न, जात प्रमाणपत्र यासारखे विविध दाखले मिळणार आहेत. सर्वसामान्य जनतेला वेळ आणि पैसा वाचवून, एकाच ठिकाणी या सेवा मिळाव्यात, हा या कॅम्पचा मुख्य उद्देश आहे.

निलेश लंके प्रतिष्ठानने नेहमीच सामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य दिले असून आपली सेवा, आपल्याच दारी या ब्रीद वाक्यानुसार हा उपक्रम राबवला जात आहे. ग्रामस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह कॅम्पला



उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कॅम्प यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी (संपर्क: ९६८९०१२१२१) यांच्यासह संपूर्ण टीम कार्यरत आहे. हा कॅम्प ग्रामस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून गावातील प्रत्येक नागरिकाने याचा लाभ घेऊन आपली प्रशासकीय कामे सोयीस्करपणे पूर्ण करावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निलेश लंके प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमाचे गावकऱ्यांकडून स्वागत होत आहे.

## पुनर्वसितांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत प्रकल्पग्रस्तांच्यावतीने समन्वयक कांबळे यांची मागणी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२४, पाटण (सातारा) :** सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या कोअर क्षेत्रात येणाऱ्या पाटण तालुक्यातील मौजे मळे, कोळणे, पाथरपुंज या गावातील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन प्रक्रियेत अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. केवळ कागदोपत्री आश्वासने देवून वेळ मारून नेली जात आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होत असल्याने पुनर्वसितांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या संदर्भात निर्णय घेण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या



दालनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात यावे व पुनर्वसितांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी प्रकल्पग्रस्तांच्यावतीने समन्वयक संजय कांबळे यांनी आयुक्त, पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहेसदर गावे ३१ जुलै २००८ रोजी कोअर क्षेत्रात समाविष्ट झाल्याने 'बंदी दिनांक' म्हणून ती तारीख ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यानुसार पुनर्वसन यादी तयार करण्यात आल्या असून जमिनीशी संलग्न मालमत्तेचे मूल्यांकन ही झाले आहे. मात्र, १६ वर्षे उलटूनही पुनर्वसन कार्यवाही पूर्ण इझाली नसल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र नाराजी आहे.

प्रकल्पग्रस्तांना प्रत्येकी पर्याय रोख मोबदला व जमीन पुनर्वसन स्वीकारावा यासाठी १५ लाख रुपये प्रति खातेदार या प्रमाणात सुमारे ५७० कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. मात्र, अद्याप शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही. यासोबतच, जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडून एक एकर जमीन देण्याचे आश्वासन देण्यात आले असले तरी, त्याचीही अंमलबजावणी झालेली नाही. दिनांक ०४ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्तांच्या उपस्थितीत बैठक घेऊन या विषयावर निर्णय घेण्यात संबंधित सर्व वरिष्ठ यावा.

अधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित रहावे, अशी मागणी करण्यात आली आहे. बैठकी दरम्यान अधिकारी उपस्थित नसल्यास प्रकल्पग्रस्त दालनाबाहेर थांबून प्रतीक्षा करतील, असा स्पष्ट इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर मळे, कोळणे, पाथरपुंज गावातील खातेदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## रोल मॉडेल व्हिलेज बाभुळवाडेमध्ये शिवपाणंद रस्ते मोजणीस प्रारंभ

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२४, सुपा (अहिल्यानगर) :** शिव पाणंद रस्ते चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर तालुक्यातील शिवपाणंद शेत रस्ते मोकळे करण्यासाठी पारनेर तालुक्यातील रोल मॉडेल व्हिलेज बाभुळवाडे त भुमी अभिलेख उप अधीक्षक माधवराव पाटील यांच्या टिम कडुन प्रत्यक्ष शिवरस्ते व शेत रस्ता मोजणीस प्रारंभ झाला. शेत तिथे रस्ता, गाव तेथे समृद्धी हे धोरण घेऊन शरद पवळे यांनी शिवपाणंद शेत रस्ते मोकळे करण्यासाठी चळवळ उभारली. राज्यभरात चळवळीचे संघर्ष केला नंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शरद पवळे यांच्या चळवळीची दखल घेऊन शिवपाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी निर्णय घेतला, शेत रस्ते मोजणी मोफत केली, पोलिस संरक्षण शुल्क माफ केले. आता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात रोल मॉडेल व्हिलेज संकल्पना राबविण्यात



### शरद पवळे - शिवपाणंद रस्ते चळवळीचे ऐतिहासिक यशस्वी पाऊल

शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी ला ऐतिहासिक प्रारंभशिव पाणंद रस्ते चळवळ उभी राहिली मुळें आम्ही शेतकऱ्यांच्या समृद्धी साठी आम्ही प्रयत्न करत आहेत. बाभुळवाडे रोल मॉडेल व्हिलेज हे आता राज्यात आदर्श ठरणार असून मोजणीस प्रारंभ झाला मुळे ऐतिहासिक यश मिळाले आहे.

**शरद पवळे (प्रणेते, शिव पाणंद शेत रस्ते चळवळ, महाराष्ट्र)**

शिव पाणंद रस्ते चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली रोल मॉडेल व्हिलेज बाभुळवाडे हाती घेतले असून भूमी अभिलेख विभाग वतीने शिवरस्ते,पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी मोजणी सुरू केली आहे. यासाठी ग्रामस्थ, शेतकऱ्यांनी सहकार्य केले वर संपूर्ण मोजणी कमी कालावधीत पूर्ण होईल.

**माधवराव पाटील (उप अधीक्षक, भुमी अभिलेख विभाग पारनेर)**

येत आहे. त्यानुसार पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे हे गाव शिवपाणंद शेत रस्ते मोकळे करण्यासाठी रोल मॉडेल व्हिलेज म्हणून घेण्यात आले.

यासाठी शरद पवळे यांनी ग्राम सभा,शिवारफेरी, शेतकरी, अधिकारी संवाद उपक्रम राबविले. आणि आता बुधवारी प्रत्यक्ष शिवरस्ते मोजणी प्रारंभ भूमि अभिलेख उप अधीक्षक माधवराव पाटील, किरण हराळ यांनी सुरू केली. यावेळी चळवळीचे सुरेश वाळके, पवार तलाठी, भिवाजी जगदाळे (सरपंच), बाळासाहेब नवले (उपसरपंच), प्रमोद खणकर (ग्रामपंचायत सदस्य), दिलिप बोरुडे (तंटामुक्ती अध्यक्ष), जयसिंग खणकर (चेरमन), निशिगंधा बोरुडे (ग्रामपंचायत सदस्य) सामाजिक कार्यकर्ते गुलाब नवले, बाबुराव पटाडे, दादाभाऊ बोरुडे, दत्तू बोरुडे, बाबाजी बोरुडे, प्रशांत बोरुडे, इंदुबाई बोरुडे, मंगेश खणकर, विलास खणकर, सचिन कामठे, गहीनाजी कामठे आदी उपस्थित होते.

## डिसेंबर अखेर नव्या १ हजार ३०० उद्योजकांना अर्थसहाय्य; बँकांना उद्दिष्ट - आ.पाटील यांचे निर्देश

**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि.२४, तुळजापूर (धाराशिव) :** मागील ३ वर्षापासून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत आपला जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. ठरवून दिलेले उद्दिष्ट मागील ३ वर्षांपासून आपण सातत्याने पूर्ण केले आहे. शेकडो तरुणांना यातून हक्काचे उद्योग उभारता आले आहेत. चालू वर्षात डिसेंबर अखेर आणखी १ हजार ३०० नव्या उद्योजकांना आर्थिक सहकार्य करण्याचे उद्दीष्ट ठरवण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व बँकांनी यंदाही आपला जिल्हा राज्यात अव्वल क्रमांकावर कायम ठेवण्यासाठी निर्धारित करण्यात आलेले उद्दिष्ट डिसेंबर पर्यंत पूर्ण करावे, असे आवाहन मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

नुकतेच तुळजापूर - धाराशिव विधानसभा मतदार संघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP), मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) तसेच विविध आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजना व प्रकल्पासाठी देण्यात येणाऱ्या कर्ज वितरणाबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्ह्याचे अग्रणी बँक व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक तसेच सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक, सर्व महामंडळांचे अधिकारी उपस्थित होते. सध्या जिल्हा उद्योग केंद्रातून एकत्रित २५० प्रकरणे मंजूर केली जातात. मात्र, त्यामुळे सुरुवातीला मंजुरीसाठी प्रकरण दाखल केलेल्या अर्जदारांना मंजुरी मिळण्यास खूप उशीर होतो. त्यामुळे आता २५ प्रकरणे दाखल होताच त्वरीत मंजुरी देण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सर्व महामंडळांनी आपापल्या योजनांतर्गत कर्जवाटपाचे उद्दिष्ट वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बँकेची रिकव्हरीची अडचण समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याबाबत देखील यावेळी चर्चा झाली. यावेळी सर्व महामंडळांकडून कुठल्या योजनेअंतर्गत किती जणांना मदत करण्यात आली याची सविस्तर माहिती मागवण्यात आली होती. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना इन्शुरन्सच्या माध्यमातून मदत करण्यासंबंधी राबवल्या जात असलेल्या प्रभावी उपाययोजनांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. चालू वर्षासाठी जिल्ह्याला अर्थात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती (सीएमईजीपी) कार्यक्रमांतर्गत १ हजार ३०० नवीन उद्योजक उभे करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. २०२२ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत हा उपक्रम सुरू केला होता. त्यातून हजारो युवकांनी स्वतःचे उद्योग उभारले आहेत. जिल्ह्यातील बँकर्सना डिसेंबर २०२५ वर्षात नवीन लक्ष देण्यात आले आहे. धाराशीव जिल्ह्यातील विविध सरकारी महामंडळ योजनांअंतर्गत प्रस्तावांचा मागोवा ठेवण्यास मदत करणारे पोर्टल विकसित करण्यासाठी दिशादर्शक प्रकल्प सुरू केला जाऊ शकतो.

# बहुचर्चित पलावा पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२४, ठाणे :** कोंडीचे जंक्शन म्हणून ओळखलं जाणाऱ्या कल्याण-शीळ रस्त्यावरील सात वर्षांपासून काम सुरू असलेला पलावा उड्डाणपूल वाहतुकीसाठी नुकताच खुला झाला. काही दिवसांपूर्वीच या पुलाचा लोकार्पण सोहळा पार पडला, पण तरीदेखील हा पूल खड्डेमय झाला असून प्रवासी नागरिकांची डोकेदुखी आणखीच वाढली आहे.पलावा जंक्शन येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पलावा उड्डाणपुलाचे काम हाती घेतले गेले होते. हे काम एमएसआरडीसीच्या माध्यमातून खासगी कंत्राटदाराकडून केले गेले. मात्र लोकार्पण झाल्यानंतर काहीच दिवसांत या पुलाची अवस्था खूपच बिकट झाली आहे. पुलावर काही दिवसांत पावसाने खड्डे पडले आणि हा पूल पुन्हा चर्चेत आला आहे. हा पूल नागरिकांसाठी खुला करण्यात आला त्यावेळी



नागरिकांची डोकेदुखी कमी होईल असं वाटले होते,परंतु तसं न होता नागरिकांना आणखी जास्त समस्यांचा सामना करावा लागत आहे.

गेल्या काही दिवसांपासून शहरात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत असल्याने, विविध परिसरातील रस्ते खड्ड्यांनी भरले आहेत, ज्यामुळे पादचाऱ्यांना आणि वाहनचालकांना त्रास होत आहे. अशा या ठिकाणी अनेक अपघात होत असूनही अद्याप खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी कोणतेही पाऊल उचलण्यात आलेले नाही. या रस्त्यावरून रोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अनेक शारीरिक तसेच मानसिक त्रासाचा सामना करावा लागत असल्याचं प्रवासी सांगतात. या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त होऊन लवकरात लवकर चांगल्या रस्त्यांची मागणी करत आहेत.एकंदरीत ठाण्यात खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिक त्रस्त झाले असताना काही ठिकाणी आता हे खड्डे बुजविण्यासाठी वाळू टाकण्यात आलेली असून त्यामुळे दुचाकी आणि हलकी वाहने घसरून अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

# महाबळेश्वर येथे ठाकरे गटाकडून खड्ड्यात वृक्षारोपण

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२४, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्यात मे महिन्यापासून पावसाला सुरुवात झाली असून पावसामुळे महाबळेश्वर पांचगणी या मुख्य रस्त्यांसह दरवर्षी प्रमाणे अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली असून डांबरी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या विरोधात शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने खड्डयात वृक्षारोपण करून निषेध नोंदवण्यात आला. यावेळी ८ दिवसात खड्डे न मुजवल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा शिवसैनिकांच्या वतीने देण्यात आला. महाबळेश्वर ते पांचगणी या मुख्य रस्त्यांसह अनेक ठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे अपघातांना निमंत्रण देत आहेत. यातून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळेच वेण्णा लेक परिसरात खड्डयात वृक्षारोपण करून शिवसेना स्टाइल आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हा प्रमुख यशवंत घाडगे, शहर प्रमुख राजाभाऊ गुजर, तालुका प्रमुख संतोष जाधव, उपतालुका प्रमुख राजेश घाडगे, विभाग प्रमुख शंकर ढेबे, मिडीया



प्रमुख चंद्रकांत पांचाळ इत्यादी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी खड्ड्यात वृक्षारोपण केले. यावेळी शिवसैनिकशाहनवाज खारखंडे, आसिफ महापुळे, अल्ली वारुणकर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तारळी धरणाची सुरक्षितता ऐरणीवर; सुरक्षेचे फलक लावून सुरक्षा होणार का..?

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि. २४, पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यात कोयना नंतर बहुचर्चित आलेले तारळी धरण पर्यटकांचा हॉटस्पॉट बनते आहे. या धरणाच्या परिसरात असलेले निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी मोठी गर्दी होत आहे. मात्र हुल्लडबाजी, मद्यपी करणाऱ्या तरुणांमुळे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांना या हुल्लडबाजी तरुणांमुळे त्रास होत असल्याचे समोर येत आहे. यासह तारळी धरणावर कोणतीही सुरक्षा यंत्रणाच नाही म्हणाल्यावर धरण परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांची हुल्लडबाजी दुप्पटीने वाढत आहे. या हुल्लडबाजी तरुणांच्यामुळे तारळी धरणाची सुरक्षा यंत्रणाच ऐरणीवर आली आहे. धरणाच्या भिंतीवर केवळ सुरक्षेचे फलक लावून धरणाची सुरक्षा होणार नाही की तरुणांची हुल्लडबाजी थांबणार नाही. तर तारळी धरणावर चौवीस तास सुरक्षितता असणे आवश्यक असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

१९९५-९६ साली शिवसेना - भाजप महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभाग अंतर्गत कृष्णा खोरे विकास महामंडळाने पाटण तालुक्यातील तारळे विभागात डांगिष्टेवाडी येथे तारळी नदीवर धरण बांधण्यास मंजुरी

## धरण परिसरात तरुणाईची हुल्लडबाजी



दिली. सरासरी ५ टिएमसी पाणी साठा होणाऱ्या या धरणासाठी १९४.३२ कोठी रुपये मंजुरी दिली. पाटण, कराड, सातारा, माण, खटाव या तालुक्यातील १५,३८३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी १९९९ ते २०१४ या कालावधीत काँग्रेस- राष्ट्रवादी युती सरकारने हे धरण अंतिम टप्प्यापर्यंत बांधण्यासाठी १६१०.३२ कोटी एवढा प्रचंड खर्च करून तारळी धरण पुर्णत्वास आणले. मध्यंतरी चर्चेत आलेल्या महाराष्ट्र सरकारच्या जलसंपदा विभागातील सिंचन घोटाळा प्रकरणात तारळी धरण बहुचर्चित झाले.

या धरणाच्या आजुबाजुचा परिसर सह्याद्रीच्या डोंगररांगांनी हिरवाईने नटलेला आहे. डोंगरावरून कोसळणारे धबधबे, तारळी धरणात पाण्याचा झालेला पूर्ण साठा, धरणाच्या सांडव्यावरुन कोसळणारे पाणी हे दृश्य पर्यटकांना आकर्षित करीत आहे. सुट्टीच्या दिवशी तारळी धरण परिसरात निसर्ग सहलीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी वाढत आहे. यात तरुणाईची संख्या मोठी आहे. धरण परिसरात व धरणाच्या भिंतीवर फोटो सेशन, सेल्फी काढण्यासाठी काही तरुणांचा काही ताळतंत्र राहत नाही. अशातच काही तरुण मद्यप्राशन करून धांगडधिंगाना घालत आहेत. याचा बहुतांश त्रास पर्यटनाचा खरा आनंद घेण्यासाठी आलेल्या सूज्ञ पर्यटकांना होत आहे.

या धरणावर जलसंपदा विभागाकडून सुरक्षा रक्षकांसाठी निवासस्थान बांधण्यात आले आहे. ते सध्या पूर्ण बंद अवस्थेत आहे. या निवासस्थानाच्या बाहेर केवळ सुरक्षेचे फलक लावण्यात आले आहेत. मात्र सद्य परिस्थितीत धरणाच्या भिंतीवर, मार्गावर, परिसरात कोणतीही सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित नाही. त्यामुळे धरणाची सुरक्षा ऐरणीवरच असल्याचे नागरिकांच्या चर्चेत आहे.

# कलाशिक्षण मंडळाच्या दुप्पट शुल्क वाढीविरोधात संताप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, जळगांव :** महाराष्ट्र कलाशिक्षण मंडळ दरवर्षी आयोजित करत असलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षांची फी यावर्षी दुप्पट वाढविण्यात आली आहे. मागील वर्षी एलिमेंटरी परीक्षेसाठी फक्त ५० रुपये तर इंटरमिजिएटसाठी १०० रुपये इतकी परीक्षा फी होती. मात्र यावर्षी ती अनुक्रमे १०० रुपये आणि २०० रुपये इतकी करण्यात आली आहे. ही वाढ अचानक आणि कोणतीही पूर्वसूचना न देता वाढ करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेचा लाभ घेणे कठीण झाले आहे. विशेषतः खेड्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही फी वाढ मोठा अडथळा ठरत आहे. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेचे रंग साहित्य घेण्यासाठी देखील मोठी रक्कम खर्च करावी लागत असते. तसेच परीक्षेला जाताना दररोजचा प्रवास यामध्ये देखील विद्यार्थ्यांना खर्च करावा लागतो. अशा स्थितीत अनेक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे राज्याध्यक्ष नरेंद्र बाराई यांनी यावर तात्काळ प्रतिक्रिया दिली असून, ही अन्यायकारक वाढ तातडीने मागे घ्यावी. यासाठी कलाशिक्षण मंडळाकडे अधिकृत पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरू केला आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी मंडळाने सामाजिक जबाबदारीने निर्णय घ्यावा, अशी संघ महामंडळाची भूमिका आहे. राज्यभरातील सर्व जिल्हा शाखांमार्फत ही या विषयावर तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक स्तरावरूनही शाळा, पालक, कलाशिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातून याबाबत अस्वस्थता व्यक्त होत आहे. मंडळाच्या कामकाजावर यामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, मागील दोन वर्षांपासून ऑफलाइन प्रमाणपत्रेही विद्यार्थ्यांना दिली जात नाहीत तसेच परीक्षांचे प्रश्नपत्रिका देखील मेलवर पाठवल्या जातात त्यामुळे ही वाढीव शुल्क आकारणी कशासाठी करण्यात येत आहे. ही बाब अधिक चिंताजनक बनली आहे. कलाशिक्षण क्षेत्राशी निगडित सर्व घटकांनी एकत्र येत या निर्णयाविरोधात आवाज उठवण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांचे हक्क, संधी आणि आर्थिक अडचणी लक्षात घेता, शासन व कलाशिक्षण मंडळाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे जळगाव जिल्हा अध्यक्ष प्रा.आर.एस.पाटील (कलाध्यापक) शिक्षणशास्त्र विद्यालय जळगाव यांनी कळविले आहे.

# मिरा भाईंदर जिल्हा काँग्रेस तर्फे चोहीकडे खड्डेच खड्डे; प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२४, मिरा भाईंदर :** गुरुवार, दिनांक २४ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वा. संपूर्ण मिरा भाईंदर शहरात सर्वत्र खड्डे पडले आहेत. वाहन चालकांना खूपच कसरत करावी लागते. सदर बाब माध्यमांनी अनेक वेळा प्रशासनाच्या लक्षात आणून सुद्धा खड्डे बुजवले गेले नाही. बराच ठिकाणी दु चाकी वाहनाचे अपघात झाले आहे. काँग्रेसच्या आंदोलना नंतर तरी प्रशासनास जाग येईल अशी अशा नागरिक करीत आहे.




# थोडक्यात

## पोलीस आयुक्त डुंबरे यांची नारपोली पोलीस ठाण्यात प्रेरणादायी भेट

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२३, ठाणे :** प्रेरणादायी नेतृत्व, तत्पर सेवा! या ब्रीदवाक्याला साजेशी अशी प्रेरणादायी भेट आज ठाणे पोलीस दलासाठी ठरली. पोलीस आयुक्त ठाणे आशुतोष डुंबरे यांनी दिनांक २३ जुलै २०२५ रोजी नारपोली पोलीस ठाण्यास अचानक भेट देत, अधिकाऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांचे मनोबल उंचावले. या भेटीत वृंद परिषदेच्या माध्यमातून पोलीस ठाण्यातील अडचणी, अंमलबजावणीतील आव्हानं आणि सुधारणा यावर मोकळ्या वातावरणात चर्चा झाली. आयुक्त डुंबरे यांनी प्रशासनातील अडथळ्यांवर उपाययोजना सुचवून अधिकाऱ्यांना नवचैतन्य दिले.



यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचा विशेष सन्मान करण्यात आला. गुन्हे तपासातील वेग, अचूकता आणि निपुणतेस प्रोत्साहन देत सरांनी तपास पद्धतीतील कौशल्य वाढवण्यावर भर दिला. पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि व्यावसायिक कौशल्य हेच ठाणे पोलीस दलाचं खऱ्या अर्थानं बळ आहे, असं मत आयुक्तांनी व्यक्त केलं. ठाणे पोलिसांचं हे चांगलं नेतृत्व आणि संघभावना भविष्यातील आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

## श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात लोकमान्य टिळकांची जयंती साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, बुलडाणा :** श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. वनसंवर्धन दिन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे प्राचार्य श्री.कावरे यांनी भूषविले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेचे प्रभारी पर्यवेक्षक श्री.राजपूत, श्री.वाघ, श्री.डी.के पाटील व मांगे बाबूजी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व लोकमान्य टिळक व वनसंवर्धन दिनानिमित्तय भाषण श्री.ढोमणे यांनी केले. कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## सारथी सोशल फाउंडेशन मार्फत विद्यार्थ्यांना वृक्षारोपण किट साहित्याचे वाटप

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२४, सातारा :** श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी - गजवडी संचलित श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले विद्यालय व ज्युनिअर कॉलेज सोनवडी गजवडी येथे सारथी सोशल फाउंडेशन पुणे यांच्या मार्फत इयत्ता पाचवी ते दहावी मधील विद्यार्थ्यांना एकूण ७५ वृक्षारोपण कीट साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी वृक्ष लागवड करताना या किट मधील साहित्याचा वापर कसा करायचा व लागवड केलेल्या रोपांची नोंद ठेवणे तसेच त्यांचा रिपोर्ट शाळेत देणे इत्यादी बाबत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. श्री.पवार यांनी रानभाज्या उपक्रम या विषयावर विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे आभार देशमुख यांनी मानले. या कार्यक्रमास उपस्थित सांस्कृतिक विभाग प्रमुख गाढवे, तोडकरी, कदम तसेच संस्थेचे सचिव झणझणे, उपाध्यक्ष युसुफभाई पटेल, संचालक कारंडे, खामकर तसेच सोनवडी गावच्या सरपंच कदम व विद्यालयाचे प्राचार्य मोरे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्सहात पार पडला.




## मंगरूळ येथे प्रा.कांगणे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.२४, धाराशिव :** उद्धव बाळासाहेब ठाकरे, खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कळंब तालुक्यातील मंगरूळ येथे प्रा.विठ्ठल कांगणे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी आमदार कैलास घाडगे पाटील हे होते. हा कार्यक्रम कळंब तालुका युवा सेनाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार कैलास घाडगे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राध्यापक कांगणे यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टीकडे दुर्लक्ष करून सकारात्मक बाबींचा अंगीकार करावा. आपली प्रगती कशी करता येईल याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित केलं पाहिजे. विज्ञान युगात मोबाईल सारख्या प्रसारमाध्यमांचा अभ्यासाशिवाय मुलं काय काय बघतात याकडे पालकांनी लक्ष देणं खूप गरजेचं आहे. असेही त्यांनी यावेळी आपल्या खास शैलीत मार्मिकतेने सांगितले व त्यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे कान टोचलेव यशाचा मार्ग कसा सुखकर करता येईल हेही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना महत्व पटवून सांगितले. या कार्यक्रमास मंगरूळ, शे. धानोरा, धाराशिव, देव धानोरा येथील विद्यार्थी, शिक्षक, सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक गायकवाड यांनी केले, प्रस्ताविक पंडित देशमुख तर उपस्थितांचे आभार अमृत जाधव यांनी मानले. यावेळी प्रदीप मेटे, सचिन काळे, मनीषा वाघमारे, दिलीप पाटील, मनोहर धोंगडे, संदीप पालकर, विश्वजीत जाधव, पंडित देशमुख, गोविंद चौधरी, मेघराज मुंडे, शुभम करंजकर, नदिम शेख, आकाश पवार, प्रज्योत माने, बाळासाहेब काळे, बिभीषण गायकवाड, राजेभाऊ भराडे, दिलीप रितापुरे, किरण काळे, खेलबा सुडके, लक्ष्मण रितापुरे, रंजीत देशमुख, किशोर भोसले आदी ग्रामस्थ विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.